RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

मराठी
# अक्रॉस मुंबई
संपादक- संजय मंगेश भैरे

वर्ष: ९ अंक : २३ ■ मुंबई, मंगळवार ३० एप्रिल ते ०६ मे '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८

बाळासाहेबांनी मला मुख्यमंत्री केलं ही उद्धव ठाकरेंची खरी पोटदुखी - राणे

पान २ पाहा

मतांसाठी काँग्रेस कोणत्याही थराला जाईल - मोदी

पान ३ पाहा

## “आम्ही सुरतला गेल्यावर उद्धव ठाकरे भाजपा नेतृत्वाला फोन करून म्हणाले...”, एकनाथ शिंदेंचा मोठा दावा

■ **मुंबई**

जून २०२२ मध्ये महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा भूकंप झाला होता. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतील ४० आमदारांना बरोबर घेत पक्षाविरोधात दंड थोपटले. या आमदारांना विश्वासात घेऊन शिंदे यांनी वेगळा गट बनवला. या गटाने भाजपाबरोबर राज्यात सत्तास्थापन केली. तसेच एकनाथ शिंदे राज्याचे मुख्यमंत्री झाले. पाठोपाठ शिंदेंच्या गटाने मूळ शिवसेना पक्षावर दावा केला आणि निवडणूक आयोगाने शिंदेंच्या गटाला मूळ शिवसेना पक्ष म्हणून मान्यता दिली. तसेच पक्षाचं अधिकृत चिन्हदेखील त्यांनाच बहाल केलं. दरम्यान, एकनाथ शिंदे यांचं बंड मोडून काढण्यासाठी पक्षाचे प्रमुख आणि राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी खूप प्रयत्न केले. मात्र त्यात त्यांना यश आलं नाही. एकनाथ शिंदे बंडखोरी करून सुरतमार्गे गुवाहाटीला गेले होते. दरम्यान, ते आणि त्यांच्याबरोबरचे आमदार सुरतमध्ये असताना नेमकं काय घडलं होतं. पडद्यामागे कोणत्या हालचाली केल्या जात होत्या यावर शिंदे यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे.

एकनाथ शिंदे यांनी एका खाजगी मराठी वृत्तवाहिनीशी बातचीत केली होती. त्यावेळी त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता की, शिवसेनेत बंड करून तुम्ही गुजरातमधील सुरत शहरात गेलात तेव्हा उद्धव ठाकरे यांनी तुम्हाला फोन करून परत बोलावलं होतं, तुम्ही तिथल्या चहाच्या टपरीवरून त्यांच्याशी बोललात? अशा बातम्या अलिकडे पाहायला मिळाल्या होत्या. त्याबद्दल काय सांगाल, त्यावेळी नेमकं काय घडलं होतं? यावर एकनाथ शिंदे म्हणाले, आम्ही मुंबईवरून बोलत आणि जाहीरपणे गेलो. आम्ही काही लपून छपून गेलो नाही. बोलत गेलो... खुलेआम... जाहीरपणे गेलो. राहीला प्रश्न परत बोलावण्याचा तर, एकीकडे आम्हाला परत बोलवायचं आणि दुसऱ्या बाजूला आमचे पुतळे जाळायचे, आमची पक्षातून हकालपट्टी करायची, असा सगळा प्रकार चालू होता. त्याचवेळी भाजपाच्या नेतृत्वाशी फोनवरून चर्चादेखील केली जात होती. ते (उद्धव ठाकरे) भाजपा



नेतृत्वाला म्हणाले, तुम्ही यांना (आम्हाला) कशाला घेता, त्यापेक्षा आम्हीच तुमच्याबरोबर येतो. परंतु, भाजपा नेतृत्वाने तुम्हाला (ठाकरे गट) त्यांच्याबरोबर घेण्यासाठी तुमच्याकडे काही आहे का? आम्ही गेल्यावर तुमच्याकडे काय राहिलंय?

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार असताना शिवसैनिकांचं खुलेआम खच्चीकरण केलं जात होतं. हे खच्चीकरण थांबवण्यासाठी, काँग्रेसच्या दावणीला बांधलेली शिवसेना सोडवण्यासाठी, आमचा धनुष्यबाण वाचवण्यासाठी आम्ही हे (बंडखोरी) पाऊल उचललं. हे पाऊल टोकाचं होतं, धाडसाचं होतं, परंतु आम्ही ते पाऊल उचललं. त्यासाठी हिंमत लागते जी आम्ही दाखवली.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रश्न विचारण्यात आला की, तुम्ही भाजपाबरोबर जाऊन खूश आहात का? त्यावर शिंदे म्हणाले, आमची भाजपाबरोबर अनेक वर्षांपासून वैचारिक युती होती. ही युती शिवसेनाप्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे, अटल बिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे या सर्वांच्या प्रयत्नांमुळे झाली होती. तीच युती आम्ही केली. ही युती उद्धव ठाकरे यांनी तोडली होती. त्यांनी केलेली चूक आम्ही दुरुस्त केली. आम्ही शिवसेना आणि भाजपाची वैचारिक युती पुन्हा केली. त्यामुळे नाराजीचा, नाखुशीचा प्रश्नच येत नाही.

# डोळ्यात धुळ फेकण्यात आणि खोटं बोलण्यात काँग्रेस पक्ष मास्टर, पीएम मोदींचा साताऱ्यातून हल्लाबोल




■ **सातारा**

काँग्रेसने 40 वर्षांपासून सैनिक परिवारापासून वन रँक वन पेंशन पासून वंचित ठेवले. फक्त 500 कोटींचा झुनझुना दाखवला. डोळ्यात धुळ फेकण्यात आणि खोटं बोलण्यात काँग्रेस पक्ष मास्टर आहे. काँग्रेसने 60 वर्ष राज्य केले. मात्र, बाबासाहेबांचे संविधान जम्मू काश्मीरमध्ये लागू होत नव्हते. मात्र, आम्ही 370 आर्टिकल ध्वस्त करुन टाकले. मोदीने आर्टीकल 370 आर्टिकल हटवले", असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. सातारा लोकसभेचे भाजपचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा पार पडली. यावेळी ते बोलत होते.

नरेंद्र मोदी म्हणाले, सातारा देशभक्तांसाठी तीर्थक्षेत्रांपेक्षा कमी नाही. उदयनराजेंना तुम्ही येथे उमेदवार बनवले. साताऱ्यात भगवा फडकत राहिला आहे, आणि फडकत राहिला आहे. मी आज तुमचे आशीर्वाद घेण्यासाठी आलो आहे. तुम्ही तुमच्या सेवकावर विश्वास दाखवला आहे. त्यामुळे मी आज इथे आलो आहे. एवढ्या मोठ्या संख्येने माता-भगिनी आल्या आहेत.

पुढे बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, 2013 मध्ये भाजपने मला पंतप्रधान पदाचा उमेदवार म्हणून घोषित केले. तेव्हा मी रायगडच्या किल्ल्यावर गेलो होतो. कोणतेही काम सुरु काम करण्यापूर्वी मी शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी ध्यानस्थी होऊन बसलो होतो. त्यावेळी शिवाजी महाराजांच्या समाधीपासून मला प्रेरणा आणि उर्जा मिळाली. त्यामुळेच मी गेल्या 10 वर्षात आदर्श विचारांची जगण्याचा प्रयत्न केला. काहीना काही करण्याचा प्रयत्न केला आहे. साताऱ्याची भूमी शूर वीरांची भूमी आहे. अपशिंगे गाव असो किंवा साताऱ्यातील कोणतेही गाव असो आत्मनिर्भर होत असलेल्या भारतीय सेनेला पाहून खूश आहे.

उदयनराजे भोसले म्हणाले, स्वातंत्र्य मिळालं तेव्हा प्रत्येक राज्यात काँग्रेसचं सरकार होतं. फक्त भाजपचे केवळ दोनच खासदार होते. संपूर्ण जगभरातील सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपची ओळख निर्माण झाली. कारण काँग्रेसने केवळ पोकळ घोषणा केल्या. केवळ मत मिळवण्यासाठी काँग्रेस पक्षाने घोषणा दिल्या. मात्र, नरेंद्र मोदींनी प्रत्येक घोषणेची अंमलबजावणी केली आहे. जवानांच्या बाबतीत योजना राबवल्या, त्यामुळे आज आपण सुरक्षित आहोत.

### पद्मशाली समाजाचं मीठ खाऊन मोठा झालोय

महाराष्ट्र सामाजिक समतेची धरती आहे. काँग्रेसच्या साठ वर्षांचा काळ देखील आपण पहिलाय, मोदींचे दहा वर्षे सेवेचे देखील तुम्ही पाहिली. मागच्या दहा वर्षात जे काम झालं ते मागच्या साठ वर्ष कधीच झालेलं नाही. अहमदाबादमध्ये पद्मशाली समाज मोठ्या प्रमाणात होता, मी त्यांचे मीठ खाऊन मोठा झालोय. त्यांचे ऋण फेडण्याचे प्रयत्न मी एकप्रकारे करतोय. कोणाचाही हक्क न काढता आम्ही सामान्य वर्गातील गरीब लोकांना न्याय देण्यासाठी दहा टक्के आरक्षण दिलं. यामुळे देशातील कोणतीही आग लागली नाही, उलट दलित नेत्यांनी स्वागत केलं. मराठी भाषेत शिकलं की संधी मिळणार नाही असं या आधीच्या सरकारने सांगितलं होतं. आम्ही सांगितलं की मराठी शिकला तरी डॉक्टर बनता येईल असं नरेंद्र मोदी म्हणाले.

### डॉ. आंबेडकर आले तरी संविधान बदलणार नाही

डॉ.आंबेडकरांपासून अनेक नेत्यांचा अपमान काँग्रेसने केला. त्यांना भारतरत्न देखील देताना भाजपने पाठिंबा दिलेला. त्यावेळी देशात काँग्रेस विरोधी सरकार होते. तुम्ही बहुमत दिलं आणि दलितच्या मुलाला राष्ट्रपती बनवलं, आदिवासी मुलीला पहिल्यांदा राष्ट्रपती बनवले. एससी, एसटी सर्वात जास्त नेते भाजपमधून निवडून येतात. 60 टक्क्यांपेक्षा जास्त लोक केंद्रात मंत्री आहेत, ते याचं वर्गातून येतात. ओबीसी प्रतिनिधित्व नावाखाली खोटं पसरवण्याचे काम काँग्रेस करतेय. संविधान बदलणार, आरक्षण संपवणार असे खोटं बोलतायत. स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर देखील आरक्षण संपवणार नाहीत, मोदी तर दूरची गोष्ट आहे.

### ओबीसी, एससी-एसटी आरक्षण काढणार नाही

पाच वर्षांच्या काळात मोदीजवळ जेवढे हवे तेवढे मतं आहेत, पण हा रास्ता आम्हाला मान्य नाही. आमच्या पूर्वजानी पाप केलं असतील, त्याचे प्रायश्चित करण्याची ही वेळ आहे. एसटी, एससी, ओबीसी आरक्षणमध्ये लूट करून अल्पसंख्यांकांना द्यायचे आहे. मला काँग्रेसने तुमच्या विरोधात रचलेलं षडयंत्र मोडून काढायचं आहे. कर्नाटकमध्ये देखील काँग्रेसने हेच केलं, पण मी होऊ देणार नाही. त्यामुळे मोदीचे हात मजबूत करा ही मागणी घेऊन मी तुमच्याकडे आलोय.

### 25 कोटी लोक गरिबीतून बाहेर पडले

एससी एसटी यांच्यापर्यंत योजना पोहोचवण्यासाठी आमचं सरकार शेवटच्या टोकापर्यंत जात आहेत. 25 कोटी गरीब हे गरिबीतून बाहेर आलेत. नियत बरोबर असेल तर निकाल पण बरोबर मिळतात. व्हायब्रंट भारत ही आमची योजना आहे, सीमेवर असलेले गावात वोटर जास्त नाहीत, पण मला त्यापेक्षा माझे देशाचे नागरिक मोठं आहेत. गाव आणि शहरात दरी या काँग्रेसने निर्माण केली. काँग्रेससारखी माझी नजर फक्त व्होटबँक म्हणून असती तर कोट्यवधी रुपयांची योजना आणली नसती. काश्मीरमध्ये पहिल्यांदा एससी, एसटी, ओबीसी आरक्षणाचा फायदा मिळाला.

## मोदींमुळे भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची चीनचीही हिंमत नाही, देवेंद्र फडणवीस यांचा दावा

■ **सोलापूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वाखाली भारत देश मजबूत आणि शक्तिशाली बनल्यामुळे चीनसुध्दा आपल्या देशाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करू शकत नाही, असा दावा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

बार्शी येथे धाराशिव लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या प्रचारार्थ आयोजित सभेत फडणवीस यांनी, नरेंद्र मोदी विरूध्द राहुल गांधी अशी यंदाची लोकसभा निवडणूक असल्यामुळे देशाला आणखी शक्तिशाली बनविण्यासाठी मोदी यांचे हात बळकट करण्याचे आवाहन केले. यावेळी शिवसेना शिंदे गटाचे नेते, धाराशिवचे पालकमंत्री प्रा. तानाजी सावंत, बार्शीचे भाजप पुरस्कृत अपक्ष आमदार राजेंद्र राऊत, महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील आदी उपस्थित होते.

फडणवीस यांच्या भाषणाचा मुद्दा नरेंद्र मोदी हाच होता. ते म्हणाले, करोना काळात देशात लाखो लोक किड्यामुंग्यांसारखे मरत असताना नरेंद्र मोदी यांनी शास्त्रज्ञांना एकत्र करून करोना प्रतिबंधक लस तयार केली आणि देशातील सर्व १४० कोटी जनतेला मोफत दिली. म्हणून वाचू शकला. दुसरीकडे देशाची अर्थ व्यवस्था जगात तेराव्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर आणताना पंतप्रधान मोदी यांनी देश शक्तिशाली बनविला. देशाची सुरक्षा व्यवस्था बळकट करताना सात हजार किलो मीटर अंतरापर्यंत लक्ष्य भेदू शकेल, एवढे प्रचंड मोठे अग्नी मिसाईल तयार केले. त्यामुळे चीनसारखा देशही भारताकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत करू शकत नाही, असा दावा त्यांनी केला.



# डॉ. आंबेडकर महाराष्ट्राचे सुपुत्र; त्यांची राज्यघटना बदलण्याचा मोदी-शहांचा डाव

**प्रतिनिधी**
■ **रत्नागिरी**

भाजपकडून दिला जाणारा चारशे पारचा नारा कशासाठी, आपली घटना बदलण्यासाठी. घटना बदलण्याची औदासा का आणली? महाराष्ट्राचे उद्योगधंदे गुजरातला पळवत आहात. महाराष्ट्राच्या हक्कासाठी लढणाऱ्या शिवसेनेला संपवत आहात. एवढच काय डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महाराष्ट्राचे सुपूत्र आहेत, त्यांनी राज्यघटना लिहिली म्हणूनच महाराष्ट्र द्वेषापोटी मोदी-शहा संविधान बदलू पाहताहेत, असा आरोप ठाकरे शिवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. तर उंचीएवढा लघु उद्योग तरी कोकणात आणला का?, असा सवाल करत ठाकरेंनी नाव न घेता नारायण राणे यांना डिवचलं आहे.



**भाजपला मत म्हणजे विनाशाला मत**

*उद्धव ठाकरे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस हल्ली याला मत म्हणजे मोदींना मत असलं काही तरी प्रचार करू लागले आहेत. पण मी तुम्हाला सांगतो की, मोदींना मत म्हणजे विनाशाला मत आहे. त्यामुळे जनतेने हे जागृक होऊन समजून घेणे गरजेचे आहे. अटलजींचा आत्मा वरुन रडत असेल. ते बोलले होते की, अशी सत्ता मला मिळत असेल तर मी चिमटीतही पकडणार नाही. आता अटलजींचा आत्मा ढसाढसा रडत असेल. नाकार्तांच्या हातामध्ये भाजप पक्ष गेला आणि भाजप पक्ष संपवून टाकला. अरे शिवसेना आख्खी तुमच्यासोबत होती तेव्हा मोदी आणि शाह यांना महाराष्ट्रात कितीवेळा यावं लागलं होतं? कारण अख्खी शिवसेना त्यांच्यासोबत होती”, असं उद्धव ठाकरे म्हणाले.*

**रत्नागिरीच्या सभेत उद्धव ठाकरेंचा आरोप**

**'ते' महाराष्ट्रात जन्मले याचा अभिमान**

*तर दिल्लीतील हे दोघे महाराष्ट्रद्वेषी आहेत. आम्ही काय करणार, तुमच्या गुजरातमध्ये स्वराज्यद्वेषी जन्मला. तर आमच्या महाराष्ट्रात छत्रपती शिवराय, डॉ. बाबासाहेब जन्मले. हे आमचे वैभव असून देशाची शान आहेत, म्हणूनच केंद्रातील लोक महाराष्ट्राचा द्वेष करत आहेत, असे म्हणत उद्धव ठाकरे यांनी मोदी-शहांसह फडणवीसांवर देखील निशाणा साधला.*

**जय भवानीचे प्रेम काढू शकणार नाही**

*जय भवानी-जय शिवाजी याचं प्रेम आमच्या हृदयातून काढू शकत नाही. उद्धव ठाकरेंना संपवायचेना मग मैदानात उतरून तर पाहा, मी उतरलो तुम्ही देखील उतरून दाखवा. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे किंमत यांचा घरगडी ठरवणार का?, असा सवाल ठाकरे यांनी केला.*

**विनाशकारी प्रकल्प येऊ देणार नाही**

*बारसूचा विषय या लोकांनी फौजा आणून संपवला असता. पण या ठिकाणी शिवसेना उभी राहीली. इंडिया आघाडीचे सरकार आल्यानंतर कोणत्याही विनाशकारी प्रकल्प या ठिकाणी येऊ देणार नाही, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.*

## शहजाद्याने राजांचा अपमान केला सुलतानांवर बोलायची हिंमत नाही

**पंतप्रधान मोदींचा राहुल गांधींवर हल्लाबोल**



**वृत्तसंस्था**
■ **बेळगाव**

पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी कर्नाटकातील बेळगावी येथे पोहोचले. येथे ते निवडणूक रॅलीत म्हणाले - काँग्रेसला देशाचे यश आवडत नाही. त्यांनी आधी कोरोना लसीवर प्रश्न उपस्थित केले आणि नंतर ईव्हीएमच्या बहाण्याने संपूर्ण जगात भारताची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसच्या राजपुत्राला आपल्या राजे आणि सम्राटांचे योगदान आठवत नाही. व्होटबँकेच्या राजकारणासाठी आमच्या राजे-महाराजांच्या विरोधात बोलण्याची हिंमत त्यांच्यात आहे आणि नवाब, बादशाह, सुलतान यांच्याविरुद्ध एक शब्दही काढण्याची ताकद त्यांच्यात नाही,असा हल्लाबोल मोदी यांनी राहुल गांधी यांच्यावर चढवला.

मोदी म्हणाले- तुष्टीकरण हे काँग्रेसचे ध्येय आणि ध्येय आहे. पीएफआय ही देशविरोधी संघटना आहे ज्यावर आमच्या सरकारने बंदी घातली होती, काँग्रेस तिचा राजकीय फायद्यासाठी माध्यम म्हणून वापर करत आहे. वायनाडमध्ये (राहुल गांधींची संसदीय जागा) फक्त एक जागा जिंकण्यासाठी काँग्रेस अशा दहशतवादी संघटनेला संरक्षण देण्यात व्यस्त आहे.

जेव्हा भारत मजबूत होतो तेव्हा प्रत्येक भारतीय आनंदी असतो परंतु काँग्रेस राष्ट्रहितापासून इतकी दूर गेली आहे की त्यांना देशाचे यश आवडत नाही. भारताच्या प्रत्येक यशाची त्यांना लाज वाटू लागली आहे. ईव्हीएमच्या निमित्ताने संपूर्ण जगात भारताची बदनामी करण्याचा प्रयत्न केला,असा आरोप मोदी यांनी विरोधकांवर केला

**राजपुत्र आमच्या राजे-महाराजांना जुलुमी म्हणतात**

*काँग्रेसचे राजपुत्र म्हणतात की भारतातील राजे-महाराजे जुलमी होते, ते गरिबांच्या जमिनी हिसकावून घेत असत. काँग्रेसच्या राजपुत्राने छत्रपती शिवाजी महाराज, राणी चिन्नम्मा यांचा अपमान केला आहे. काँग्रेसच्या राजपुत्राचे विधान हे मुद्दाम मतपेढीचे राजकारण करण्यासाठी आणि तुष्टीकरणासाठी दिलेले विधान आहे, असे मोदी म्हणाले.*

## शेकडो महिलांवर अत्याचार अन् हजारो व्हिडिओ व्हायरल; माजी पीएम देवेगौडांच्या नातवाच्या सेक्स स्कँडलने खळबळ



■ **बंगळुरू**

कर्नाटकातील जनता दलाचे खासदार आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचा नातू प्रज्वल रेवन्ना यांच्यावर शेकडो महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. भर लोकसभा निवडणुकीत या घटनेनंतर खळबळ उडाली असून कर्नाटक सरकारने एसआयटीमार्फत चौकशीची घोषणा केली आहे. दुसरीकडे, प्रज्वल रेवन्ना यांनी व्हायरल व्हिडिओमध्ये छेडछाड केल्याचा आरोप केला आहे. त्यांनीही तक्रार दाखल केल्याची चर्चा सुरु असतानाच आता देश सोडून जर्मनीला पळाल्याची चर्चा आहे.

रेवन्ना हसन लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार

रेवन्ना हे माजी पंतप्रधान आणि JD(S) प्रमुख एचडी देवेगौडा यांचे नातू आहेत. 2024 च्या लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (NDA) त्यांना हसन लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. रेवन्ना हसन लोकसभा मतदारसंघातून विद्यमान JD(S) खासदार आहेत.

## मोदी ज्या पद्धतीने देश चालवतात ते पाहून चिंता वाटते!

**शरद पवारांचा पंतप्रधानांवर निशाणा**



**प्रतिनिधी**
■ **पुणे**

देशात सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आहे. प्रचाराच्या भाषणात राजकीय नेते एकमेकांवर टीका टिप्पणी करत आहेत. आज महाविकास आघाडीची सासवडमध्ये जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. “पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ज्या पद्धतीने देश चालवतात ते पाहून चिंता वाटते”, असा निशाणा पवारांनी यावेळी मोदींवर साधला.

**या लोकसभेची निवडणूक वेगळी**

*या लोकसभेची निवडणूक वेगळी निवडणूक आहे. हा देश कोणत्या पद्धतीने चालवायचा हा प्रश्न या निवडणुकीचा आहे. आज नरेंद्र मोदी आणि त्यांचे सहकारी ज्या पद्धतीने देश चालवत आहेत, ते पाहिल्यानंतर चिंता वाटते. देश चालण्याचा अर्थ हा लोकशाहीच्या मार्गाने, लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्या सहमतीने देशाचा कारभार करणे ही लोकशाहीची गरज आहे. आज काय चित्र दिसते. स्थानिक पातळीवर काय परिस्थिती आहे. जिल्हा परिषदेच्या निवडणुका झाल्या आहेत का? नगर पालिकेच्या निवडणुका झाल्या का? किती दिवसांपासून या निवडणुका झाल्या नाहीत. या संस्था किती दिवसांपासून मोकळ्या आहेत. दोन वर्ष झाले आहेत. दोन वर्ष तुम्ही निवडणुका घेणार नसाल आणि येथून सुरुवात करणार असाल तर आणखी काही दिवसांनी कदाचित विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका न घेण्याची दुर्बुद्धी या राज्यकर्त्यांना सुचण्याची शक्यता नाकारता येत नाही. ते चित्र आता दिसत आहे”, असे शरद पवार म्हणाले.*

मराठी अक्रॉस मुंबई

# बाळासाहेबांनी मला मुख्यमंत्री केलं ही उद्धव ठाकरेंची खरी पोटदुखी

## नारायण राणेंचे टीकास्त्र

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

उद्धव ठाकरे यांचा एकही खासदार निवडून येणार नाही असा दावा नारायण राणे यांनी आज केला. कुडाळ माणगाव खोऱ्यात त्यांचा राणेंच्या उपस्थितीत कार्यकर्ता संवाद मेळावा संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. या मेळाव्यात माणगाव येथील उद्धव ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी राणेंच्या नेतृत्वाखाली भाजप मध्ये प्रवेश केला.



रत्नागिरी सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार नारायण राणे यांच्या प्रचार सभा, बैठका, मेळावे सुरु आहेत. कुडाळ माणगाव खोऱ्यातील सभेत बोलताना नारायण राणे म्हणाले शिवसेनेच्या स्थापनेपासून मी शिवसेनेत होतो. बाळासाहेब ठाकरेंनी मला अनेक पद दिली. मात्र उद्धव ठाकरे यांच्याकडे काही अधिकार दिले. त्यानंतर काही मुद्यावरून उद्धवशी माझ पटले नाही.

बाळासाहेबांनी मला मुख्यमंत्री केलं हे उद्धव ठाकरे याची पोटदुखी होती. रश्मी ठाकरे यांनी उद्धवला सांगितले, जोपर्यंत राणे शिवसेनेत आहे तोपर्यंत तुम्हाला पद मिळणार नाही. शिवसेनेसाठी आम्ही केव्हा जीवाची पर्वा केली नाही, ना कुटुंबाची पर्वा केली. बाळासाहेब जीवापाड प्रेम करायचे. बाळासाहेबांनी उद्धव ठाकरेला नाही मला मुख्यमंत्री केलं. बाळासाहेब मला नेहमी म्हणायचे नारायण आपल्याला मराठी माणूस आणि हिंदुत्वासाठी काम करायचं आहे.

**ठाकरेंचा एकही खासदार निवडून येणार नाही!**
***उद्धव आता ज्याप्रकारे बोलतात ते राजकीय माणसाचे बोलणे नाही. देशाच्या पंतप्रधानाना अक्षरशः शिव्या घालतो. काय अवस्था होईल तुमची असं नारायण राणे उद्धव ठाकरे यांना उद्देशून म्हणाले. उद्धव ठाकरे यांचा एकही खासदार निवडून येणार नाही असा दावा देखील नारायण राणे यांनी केला.***

# पोरं शाळा सोडून गेली तरी शाळा कधीही बंद पडत नाही...

## जयंत पाटलांचा अजित पवारांना टोला

प्रतिनिधी
■ पुणे

देशभरात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांचा जोरदार प्रचार सुरु आहे. या प्रचाराच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूटीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि अजित पवार गटामध्ये कायमच टीका टिप्पणी सुरु असल्याचे पाहायला मिळते. आता तर लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरु आहे. त्यामुळे दोन्ही गटातील नेते एकमेकांवर टीका केल्याशिवाय राहत नाहीत.

अशातच एका सभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अजित पवार गटावर टीका केली आहे. "पोरं शाळा सोडून गेले तरी शाळा कधीही बंद पडत नाही", असा अप्रत्यक्ष टोला जयंत पाटील यांनी अजित पवारांना लगावला आहे.



"सर्वांनी अनेक शाळा पाहिल्या आहेत. पोरं शाळा सोडून गेली तरी शाळा कधी बंद पडत नाही. पुन्हा नव्यानं पोरं घडवण्याचं काम शाळेचा हेडमास्तर करतच असतो. आमचा हेडमास्तर लई खमक्या आहे. शरद पवार साहेब म्हणजे मतांचा विषय नाही. तुमच्या आमच्या काळजातला विषय आहे. हे मी महाराष्ट्रातील गावागावत गेल्यावर पाहतो आहे", असे म्हणत जयंत पाटील यांनी अजित पवार गटावर अप्रत्यक्ष निशाणा साधला.

देशात लोकसभेची निवडणूक एकूण सात टप्प्यात पार पडणार आहे. यातील दोन टप्प्यातील मतदान पार पडले आहे. तर महाराष्ट्रात एकूण पाच टप्प्यात निवडणुका होत असून यातील १९ एप्रिल आणि २६ एप्रिल अशा दोन टप्प्यांसाठी मतदान झाले. आता महाराष्ट्रात अजून ७ मे, १३ मे आणि २० मे रोजी अशा तीन टप्प्यात मतदान होणार आहे. दरम्यान, महाराष्ट्रातील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर होत असलेली ही लोकसभेची निवडणूक अनेकांसाठी प्रतिष्ठेची बनली आहे.

# धडाधड 'त्यांचे' उमेदवार पाडा

## राजू शेट्टींचे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आवाहन

प्रतिनिधी
■ सोलापूर



लोकसभा निवडणुकीच्या काळात केंद्र सरकारने महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना सहा देशांमध्ये कांद्याची निर्यात करण्यास परवानगी दिली आहे. याचे स्वागत करत हातकणंगलेचे लोकसभा उमेदवार राजू शेट्टी यांनी जोरदार टीका केली आहे. धडाधड त्यांचे उमेदवार पाडा, त्याशिवाय हेच काय कुठलेही सरकार कांद्याकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत करणार नाही, अशी टीका शेट्टी यांनी केली आहे.

निर्यातीला परवानगी द्यायचीच आहे तर सर्व अटी काढून टाका. गेल्या अनेक महिन्यांपासून शेतकरी कांदा निर्यातबंदीच्या विरोधात आंदोलन करत होते. वारंवार सरकारकडे निवेदने जात होती, आंदोलने होत होती. शेतकरी रस्त्यावर उतरत होते पण सरकार ऐकायला तयार नव्हते. जशा लोकसभेच्या निवडणुका आल्या व भाजप आणि त्याच्या मित्रपक्षांचे उमेदवार पराभूत होणार अशी लक्षणे दिसताच सरकार जागे झाले आहे, असा आरोप शेट्टी यांनी भाजपावर केला आहे.

आधी गुजरातमधील दोन हजार टन पांढरा कांदा निर्यात करण्याची परवानगी दिली. यावर टीकाटिप्पणी सुरु झाल्यानंतर आता 99 हजार टन कांदा निर्यातीला परवानगी दिली आहे. या निर्णयाचे आम्ही स्वागत करतो, पण हा फार उशिराने घेतलेला निर्णय आहे. निर्यातीला परवानगीच द्यायची आहे तर अटी कशाला घालता? असा सवाल करत शेट्टी यांनी जेवढा कांदा निर्यात व्हायचा तेवढा होऊ दे त्यावरील बंधन काढून टाकावी अशी मागणी केली आहे.

तसेच शेतकऱ्याने डोळे वटारल्यानंतर जर सरकार घाबरत असेल तर धडाधड त्यांचे उमेदवार पाडा. त्याशिवाय हेच काय कुठलेही सरकार कांद्याकडे वाकड्या नजरेने बघण्याची हिंमत करणार नाही असे आवाहनही शेट्टी यांनी शेतकऱ्यांना केले आहे.



# विधानसभेत काँग्रेस- ठाकरे सेना वेगळे लढणार

प्रतिनिधी
■ मुंबई

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आणि ठाकरे गट वेगळे लढणार, असं भाकीत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. काँग्रेस आणि ठाकरे गटाने एकमेकांवर केलेल्या आरोपांमुळे विधानसभेत त्यांचं फिस्कटणार, असा दावाही त्यांनी केला आहे. आज मुंबई येथील आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी हा दावा केला आहे. यावेळी त्यांनी देशात भाजपचे 170 पेक्षा जागा येणार नसल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

ऑक्टोबरमध्ये विधानसभा आहे. त्या विधानसभेमध्ये वंचित बहुजन आघाडी आणि काँग्रेस एकत्र लढू शकते, तेव्हा नाराजी काढा आणि वंचित बहुजन आघाडीला मदत करा. असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी कार्यकर्त्यांना केलं.



आचारसंहिता असतानाही केंद्र शासनाने त्याचे उल्लंघन केले आहे आणि इथेनॉलवरील बंदी हटवली आहे. पेट्रोल आणि डिझेलमध्ये 20 टक्के इथेनॉल वापरायची परवानगी काही वर्षांपूर्वी देण्यात आली होती. पण साखरेचे उत्पादन कमी होईल या नावाखाली इथेनॉल तयार करण्याची परवानगी काही जणांना देण्यात आली होती. याचे राजकारण आम्ही इचलकरंजी येथील सभेत मांडल्यानंतर त्याचा परिणाम आता दिसायला लागला असल्याचे त्यांनी सांगितले. ज्या प्रमाणे दुसऱ्या टप्प्यात विदर्भात आणि मराठवाड्यात आम्हाला पाठिंबा मिळाला आहे त्याचप्रमाणे पश्चिम महाराष्ट्र आणि खान्देश या भागात मिळत आहे, असेही त्यांनी म्हटले.

आंबेडकर म्हणाले की, मुंबईमध्ये दोन दिवसांत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार उभे करणार आहोत. मी असे म्हणेन की, काँग्रेसने वर्षा गायकवाड यांना उमेदवारी दिलेली आहे, पण त्यांचा आमदारकीचा मतदारसंघ सोडून उमेदवारी दिलेली आहे. वर्षा गायकवाड यांच्यासंदर्भात म्हणावे लागेल की, बळी का बकरा काँग्रेसकडून दिलेला आहे. एकनाथ शिंदे यांची शिवसेना विरुद्ध उद्धव ठाकरे शिवसेना असे काही मतदारसंघ आहेत. त्यामध्ये काँग्रेस शिवसेनेच्या उमेदवाराचे काम करत नाही आणि शिवसेना काँग्रेसच्या उमेदवारांचे काम करत नाही. त्यामुळे धर्मनिरपेक्ष मतदार हा आमच्याकडे वळला असल्याची परिस्थिती आहे.

आंबेडकरांनी भाजप आणि मोदी यांच्यावर ही निशाणा साधला ते म्हणाले की, 2014 पासून ते आतापर्यंत 17 लाख कुटुंबांनी भारताचे नागरिकत्व सोडून परदेशी नागरिकत्व स्वीकारले आहे, असे सरकार स्वतःच म्हणत आहे. आम्ही असे म्हणतो की, नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान नाहीत, तर गुजरातचे पंतप्रधान आहेत. त्यामुळे लोकांनी आता धडा घ्यावा.

### शरद पवारांचे कट्टर समर्थक भाजपच्या वाटेवर

**पुणे:** लोकसभा निवडणुकां जाहीर झाल्यापासून माढा मतदारसंघात मोठ्या राजकीय घडामोड पहायला मिळत आहे. राजकीय नेत्यांना माढ्यात शरद पवार गटाला मोठा राजकीय धक्का बसण्याची शक्यता आहे. शरद पवारांचे कट्टर समर्थक आणि पंढरपूरचे राष्ट्रवादीचे नेते अभिजीत पाटील भाजपच्या वाटेवर असल्याची सकाळ पासून चर्चा आहे. कार्यकर्त्यांची तातडीने बैठक बोलावली असून बैठकीतील निर्णयाकडे लक्ष लागलं आहे.

# अशोक चव्हाण मोठे नेते असते तर मोदी-शहांनी नांदेडमध्ये सभा घेतली नसती...

प्रतिनिधी
■ नांदेड

अशोक चव्हाण यांच्या भाजपात जाण्याने नांदेडमध्ये काँग्रेसला मोठा फटका बसू शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात आहे. या चर्चेला काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी स्पष्ट शब्दांत उत्तर दिले.

बारामतीतील प्रचारसभेत बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांनी शरद पवार गटावर टीका केली. धनंजय मुंडे यांनी शरद पवारांवर बोलावे हे योग्य नाही. शरद पवारांमुळेच ते मोठे झाले. कुणी असे काहीही बोलले तरी शरद पवार यांचे महत्त्व कमी होऊ शकत नाही. शरद पवार यांनी नेहमीच आपला पुरोगामी विचार जपण्याचा प्रयत्न केला आहे, असे बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे.



अशोक चव्हाण यांच्याबद्दल प्रतिक्रिया देताना बाळासाहेब थोरात म्हणाले की, अशोक चव्हाण भाजपात का आणि कशासाठी गेले, हे सगळ्या महाराष्ट्राला माहिती आहे. अशोक चव्हाण यांनी पक्ष सोडल्यामुळे काँग्रेसची ताकद घटली किंवा त्यांची वाढली असे दिसत नाही. असे काही असते तर, पंतप्रधान मोदी, अमित शाह आणि जेपी नड्डा यांनी नांदेडमध्ये सभा घेतली नसती. अशोक चव्हाण जर मोठे नेते असते, तर त्यांना भाजपाच्या नेत्यांच्या सभेची गरज भासली नसती, अशी खोचक टीका बाळासाहेब थोरात यांनी केली. तसेच विदर्भामध्ये महाविकास आघाडीचीच लाट आहे. जनता भाजपावर तसेच पंतप्रधान मोदींच्या विधानावर नाराज आहे. विदर्भात महाविकास आघाडीचा विजय निश्चित आहे, असा दावा बाळासाहेब थोरात यांनी केला.

# आपला एक मुद्दा संपला याचं विरोधकांना दु:ख

## देवेंद्र फडणवीसांचा टोला

प्रतिनिधी
■ पुणे

केंद्र सरकारने गुजरातमधून 2 हजार टनांपर्यंत पांढऱ्या कांद्याच्या निर्यातीला परवानगी दिली होती. यावरून विरोधकांनी केंद्र सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला. गुजरातला एक न्याय आणि महाराष्ट्राला वेगळा न्याय का? असा प्रश्न विरोधकांकडून उपस्थित केला जात होता. अशातच आता केंद्र सरकारने कांदा निर्यात संदर्भात मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारने 99 हजार 150 मेट्रीक टन कांदा निर्यातीस परवानगी दिली आहे. मात्र त्यानंतरही विरोधक टीका करताना दिसत आहे. याचपार्श्वभूमीवर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना टोला लगावला आहे.



माध्यमांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कांदा निर्यातबंदी झाल्यानंतरही केंद्र सरकारने सातत्याने कांद्याची खरेदी केली. दरवेळेस निर्यातीची लिमिट ठरवून वारंवार निर्यातील परवानगी देखील दिली. यानंतर आता खूप मोठी परवानगी दिली आहे. विरोधकांना शेतकऱ्यांशी काही देणं घेणं नाही आहे. आपला एक मुद्दा संपला याचं दु:ख आहे. शेतकऱ्यांना भडकवता येणार नाही, याचं दु:ख आहे. शेतकऱ्यांचा आता कांदा निर्यात होणार आहे, यासाठी विरोधकांनी आनंद व्यक्त करायला हवा होता. पण ते आनंद व्यक्त न करता दु:ख व्यक्त करत आहेत. त्यामुळे त्यांना शेतकऱ्यांशी काही देणंघेणं नाही, त्यांना फक्त राजकारण करायचं आहे, असा टोला देवेंद्र फडणवीस यांनी लगावला.

### नासमझ लोकांनी वेगळाच अर्थ लावला

# पंकजा मुंडेंनी नाशिकबाबतचे विधान घेतले मागे

प्रतिनिधी
■ बीड

भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी नाशिकच्या जागेबाबत केले विधान मागे घेतले आहे. काही नासमझ लोकांनी माझ्या विधानाचा वेगळा अर्थ काढला असे पंकजा मुंडे यांनी म्हंटले आहे. नाशिकच्या जागेवरून सध्या महायुतीमध्ये तिढा कायम आहे. त्यातच पंकजा यांनी केलेल्या विधानामुळे एकच खळबळ माजली होती.

आपल्या विधानावर आता स्पष्टीकरण देत पंकज मुंडे यांनी माघार घेतली आहे. "प्रीतम मुंडे यांना नाशिकमधून उभे करणार हे मी सहज बोलून गेले. काही नासमझ लोकांनी याचा वेगळा अर्थ काढला. नाशिक हे प्रीतम मुंडे यांचे सासर आहे. त्यांना सासरला पाठवता येईल, अशा आशयाने मी बोलेले. मात्र काही लोकांचे स्वागताचे मेसेज देखील आले", असे स्पष्टीकरण पंकजा मुंडे यांनी दिले आहे.



दरम्यान, बीडमधील एका प्रचार सभेत पंकजा मुंडे यांनी एक खळबळजनक विधान केले होते. प्रीतम मुंडे यांना मी नाशिकमधून उभा करेल असे त्यांनी म्हंटले होते. महायुतीच्या शिंदे गट, अजित पवार गट आणि भाजपमध्ये या जागेवरून रस्सीखेच सुरू असताना पंकजा यांनी केलेलं हे विधान चांगलेच चर्चेत आले होते.

# शरद पवारांचे साताऱ्याचे उमेदवार अडचणीत; शशिकांत शिंदेंवर आणखी एका घोटाळ्यात एफआयआर

प्रतिनिधी
■ सातारा

नवी मुंबईमधून महाविकास आघाडीसाठी एक धक्कादायक बातमी येत असून साताऱ्याचे उमेदवार शशिकांत शिंदे यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची शक्यता आहे. शरद पवार यांनी देखील शिंदे यांना अटक केली तर लोकशाहीच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यात संघर्ष उभा करण्याचा इशारा दिला आहे.

कोरेगावमधील आमदार महेश शिंदे यांनी शशिकांत शिंदेंवर मुंबई बाजार समिती घोटाळा प्रकरणी आरोप केले आहेत. उदयनराजेंनेही हा मुद्दा उचलून धरला आहे. एपीएमसी मध्ये एफएसआय घोटाळा करून प्रशासनाचे ६५ कोटींचे नुकसान केल्याचा आरोप शिंदे यांच्यावर करण्यात आला आहे.



या प्रकरणी नवी मुंबईतील एपीएमसी पोलीस ठाण्यात शिंदे यांच्याविरोधात शुक्रवारी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला आहे. 24 संचालक आणि सचिव असे 25 जणांविरोधात गुन्हा दाखल आहे. तर शिंदे यांनी या प्रकरणी अटकपूर्व जामीन मिळविला होता. हे प्रकरण २००९ चे आहे. २००९ मध्ये मसाला मार्केटच्या ४६६ गाळेधारकांना अधिकचे बांधकाम करण्यासाठी ६०० रुपये चौरस फुटाने परवानगी देण्यात आली होती. यावेळी रेडीरेकनरचा ३०६६ रुपये दर होता. यामुळे एपीएमसी प्रशासनाची ६५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात येत आहे.

# सांगलीच्या खेळीचे 'खलनायक' जयंत पाटील...

## माजी आमदार विलासराव जगताप यांचा आरोप



प्रतिनिधी
■ सांगली

सांगली लोकसभेच्या जागेवरुन काँग्रेसचे बंडखोर विशाल पाटील आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये वाद सुरू आहे. सांगलीची जागा काँग्रेसकडे जाऊ नये म्हणून काहींनी षडयंत्र रचले, ज्यात मी फसलो अशी कबुली काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी दिली होती. अशातच आता सांगलीच्या वादाचे खलनायक जयंत पाटील आहेत, असा गंभीर आरोप जत तालुक्याचे माजी आमदार विलासराव जगताप यांनी केला आहे.

जतमध्ये काँग्रेसचे बंडखोर उमेदवार विशाल पाटील तसेच माजी मंत्री अजितराव घोरपडे यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. या बैठकीत बोलताना सांगलीच्या जागेवरुन विशाल पाटील यांना डावलण्यामागे जयंत पाटील यांची खेळी असल्याचा गंभीर आरोप माजी आमदार विलासराव जगताप यांनी केला.

"सगळ्या महाराष्ट्राची तिकीटे वसंतदादा पाटील यांच्या खिशात असायची. मात्र आज त्यांच्याच नातवाला दिल्ली, मुंबई, नागपूरचे हेलपाटे घालावे लागतात, ही दुखःद बाब आहे. काँग्रेस पक्षात चाललयं काय? कोणाचे ऐकून तुम्ही करता," असा सवाल विलासराव जगताप यांनी यावेळी उपस्थित केला.

**जयंत पाटील खलनायक..**
***तसेच "या सगळ्याचा कळीचा नारद कोण आहे, हे सर्वांना माहित आहे. ही सगळी खेळी जयंत पाटलांनी केली. सांगलीची काँग्रेसची जागा जाण्याच्या खेळीतील खलनायक जयंत पाटील आहेत. संजय राऊत यांच्या माध्यमातून जयंत पाटील यांनी ही सगळी खेळी केली. जिल्ह्यातून वसंतदादा घराणे संपवण्याचा घाट राष्ट्रवादीच्या नेतृत्वाने घातलाय, मात्र आपल्याला वसंत पाटील यांच्या कुटुंबासोबत राहायचे आहे," असे आवाहनही त्यांनी केले.***

# काँग्रेसला लाथ मारा, एमआयएमचे तिकीट घ्या, नाहीतर खुर्च्या उचला !

## एमआयएम नेते जलील यांचा नसीम खान यांना खुला इशारा

प्रतिनिधी
■ औरंगाबाद

काँग्रेसकडून उत्तर मध्य मुंबईतून वर्षा गायकवाड यांच्या उमेदवारीमुळे नाराज झालेले माजी मंत्री नसीम खान यांनी स्टार प्रचारकपदाचा राजीनामा दिला आहे. महाराष्ट्रात काँग्रेसने एकही मुस्लिम उमेदवार दिला नाही असा रोष त्यांनी व्यक्त केला. यावरुन एमआयएम पक्षाच्या वतीने त्यांना थेट लोकसभा निवडणुकीच्या तिकीटाची ऑफर दिली आहे. मात्र, त्याला प्रत्युत्तर देताना नसीम खान यांनी ऑफर दिल्याबद्दल आपण त्यांचे आभार मानत असल्याचे म्हटले आहे. यावरुनही एमआयमचे नेते इम्तियाज जलील यांनी नसीम खान यांना काँग्रेसला लाथ मारा, नाहीतर खुर्च्या उचला, असे म्हणत सणसणीत इशारा दिला आहे.

काँग्रेसकडून प्रत्येक जाती आणि समाजाला प्रतिनिधित्व दिले जाईल अशी अपेक्षा असते. त्यानुसार काँग्रेसने २०१९ पर्यंत महाराष्ट्रातील प्रत्येक लोकसभेला १ किंवा २ मुस्लिमांना उमेदवारी दिली जात होती. नसीम खान हे देखील आतापर्यंत 4 वेळा आमदार, 5 वेळा मंत्री राहिले आहेत. राज्यात काँग्रेस कमजोर असूनही निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून मी नेहमीच पक्षादेशाचे पालन केले. पक्ष सांगेल त्या ठिकाणी प्रचारही केला. मात्र, आता ही जबाबदारी पार पाडणे कठीण असल्याचे नसीम खान यांनी म्हटले आहे.

नसीम खान यांनी केवळ लोकांना दाखवण्यासाठी राजीनामा दिला आहे. त्यामुळेच मी पोस्ट करत जर तुम्ही खरेच पक्षावर नाराज असल तर तिथे राजीनामा द्या आणि माझ्या पक्षाकडून तिकीट घ्या अशी ऑफर दिली असल्याचे इम्तियाज जलील यांनी सांगितले आहे. आमच्या पक्षाचे उमेदवार अंतिम झाले आहेत. तरी देखील मी तुम्हाला ऑफर देत आहे. मी आमच्या उमेदवाराला माघार घ्यायला लावतो आणि तुम्हाला तिकीट देतो. तुम्ही निवडणूक लढवा, अशी थेट ऑफर जलील यांनी दिली आहे. चांगली संधी आली आहे, हिम्मत दाखवा नाही तर नुसत्या खुर्च्या उचलत राहा. आता बघू त्यांच्यात हिम्मत आहे का? की त्यांनी फक्त नौटंकी साठी स्टार प्रचारक पदाचा राजीनामा दिला आहे. जिथे तुम्हाला मान नाही त्या पक्षात का राहता? असा प्रश्न देखील इम्तियाज जलील यांनी उपस्थित केला आहे.

**ऑफर दिली त्या बद्दल धन्यवाद -नसीम खान**
*एमआयएमच्या या ऑफरवर नसीम खान यांनी सावध प्रतिक्रिया दिली आहे. मला ऑफर दिली त्याबद्दल मी त्यांचे आभार व्यक्त करतो. मात्र त्याविषयी मला काहीही बोलायचे नसल्याचे नासीम खान यांनी म्हटले आहे. अशा प्रकारची कोणतीही ऑफर मला आकर्षित करू शकत नाही, असा दावा देखील नसीम खान यांनी केला आहे. सोनिया गांधी आणि राहुल गांधी हे आमच्या पक्षाचे नेते आहेत. मी नाराज असलो तरी पक्षाशी एकनिष्ठ असल्याचा दावा नसीम खान यांनी केला आहे.*

**नसीम खान माझ्या मोठ्या भावासारखे, ते माझा प्रचार नक्की करणार - वर्षा गायकवाड**
*नसीम खान हे माझ्या मोठ्या भावासारखे आहेत. त्यांचे आणि माझे चांगले संबंध आहे. त्यांच्या वडिलांपासूनची आमचे चांगले नाते आहे. त्यामुळे ते माझ्यासाठी नक्की प्रचार करतील, असा दावा काँग्रेस पक्षाच्या उमेदवार वर्षा गायकवाड यांनी केला आहे. ते माझे मोठे भाऊ आहेत. आणि ते नक्कीच मला साथ देतील, असा विश्वास देखील वर्षा गायकवाड यांनी व्यक्त केला आहे.*

## कोल्हापूरात मोदींचा घणाघात

# मतांसाठी काँग्रेस कोणत्याही थराला जाईल

प्रतिनिधी
कोल्हापूर

विरोधकांनी आपली रणनीती बदलली आहे. काँग्रेसचे सरकार सत्तेत आले तर सीएए रद्द करण्याचा घाट घातला जात आहे. सीएए जर रद्द करायला गेले तर काँग्रेसचा हाल काय होईल, हे त्यांना माहीत आहे का, असा सवाल करीत मात्र सीएए कायदा रद्द करू देणार नाही, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. मतांसाठी काँग्रेस कोणत्याही थराला जाईल, असेही यावेळी मोदी म्हणाले.

कोल्हापुरात तपोवन मैदानावर लोकसभा निवडणूक 2024 च्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा आयोजित करण्यात आली होती.



या वेळी ते बोलत होते. पंतप्रधान मोदींनी त्यांच्या भाषणाची सुरुवात मराठीत केली.

कोल्हापूरला महाराष्ट्राचे फुटबॉल हब म्हटले जाते. येथील स्थानिक तरुणांमध्ये फुटबॉल खूप लोकप्रिय आहे. जर मी तुम्हाला फुटबॉलच्या भाषेत सांगायचे झाले, तर काल दुसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर भाजप -एनडीए 2-0 ने आघाडीवर आहे. तिसऱ्या टप्प्याची जबाबदारी आता कोल्हापूरकरांवर असणार असल्याचेही या वेळी बोलताना पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले.

एका वर्षात एक पंतप्रधान हा काँग्रेसचा फॉर्म्युला आहे. त्याचेच नियोजन आता हे करत आहेत. देशावर पाच वर्षांत पाच पंतप्रधान थोपवण्याच्या तयारीत आहेत. हे लोकांना सहन होणार नाही. भाजपवरील राग काँग्रेस सरकार जनतेवर काढत आहे. दक्षिण भारताला तोडून दुसरा देश तयार करण्याच्या नादात काँग्रेसवाले आहेत, अशी टीका त्यांनी केली.

### *परदेशात देशाचा अभिमान वाढवणारा पंतप्रधान हवा!*



*आईचा पदर धरून राजकारण करणारा नको, परदेशात देशाचा अवमान करणारा नको तर देशाचा अभिमान वाढवणारा पंतप्रधान देशाला पाहिजे आणि असा एकच व्यक्ती आहे, ते म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी. मोदींचा जन्म राष्ट्रनिर्मितीसाठी झाला आहे. त्यांनी स्वतःला देशभक्तीसाठी वाहून घेतलं आहे. इंडी आघाडीसाठी भ्रष्टाचार हाच धर्म आहे. एक मोदी सर्वांना भारी पडतोय, असे यावेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.*

## 2 कोटी रोजगार कुठे आहेत? हीच का मोदींची गॅरंटी?

# तुम्ही 10 वर्षांत काय केले ते सांगा



## प्रियंका गांधींचा मोदींना थेट सवाल

प्रतिनिधी
लातूर

या देशाचे लोकतंत्र कमजोर करण्याचे काम मोदी सरकार करत आहे. जिथे जिथे भाजपचे सरकार आहे, तिथे तिथे भ्रष्टाचार पसरलेला आहे. मोदी म्हणतात की, भ्रष्टाचाराच्या विरोधात आहे. मग मोदींनी मग इलेक्टोरल बाँण्डची स्कीम का आणली? रेड टाकून लोकांना भीती दाखवून त्यांच्याकडून चंदा घेतला परंतु हा चंदा नही तर धंदा होता, अशी जोरदार टीका प्रियंका गांधी यांनी मोदींवर केली आहे. त्या उदगीर येथे सभेला संबोधित करतांना बोलत होत्या. मोदींनी 10 वर्षांत नेमकं काय केलं, असा सवालही त्यांनी यावेळी विचारला.

संपूर्ण देशातील मीडिया देखील भाजपच्या सोबत आहे. कारण मीडियाचे मालकदेखील अरबपती आहेत. आज सत्यता समोर येत नाही आहे. तसेच ही सत्यता कोणतीही मीडिया दाखवत नाही. जे सरकारमध्ये आहेत, ते तुम्हाला भरकटवण्याचं काम करत आहेत. ते आता तुम्हाला सांगत आहेत की, सत्तर वर्षात काँग्रेसने काय केले, परंतु मोदींनी गेल्या दहा वर्षात काय केलं, ते सांगावं, असा सवाल मोदींना प्रियंका गांधी यांनी केली. मोदींनी सांगितले होते की, दोन कोटी रोजगार देणार मग आज तो रोजगार कुठे आहे.

मोदींनी महाराष्ट्रात पैसे देऊन सरकार बनवले. अन्य दोन पक्षांना फोडून स्वतः सत्तेत बसले. हा मोठा गुन्हा आहे. या देशातील संविधानात व्यावसायिक, गोर-गरीब, दीन, दलित यांना सर्वांना समान अधिकार आहे. आणि दुसरीकडे, मोदी म्हणत आहेत की, आम्ही पुन्हा सत्तेत आले की, आम्ही संविधानही बदलून टाकू, असे त्या म्हणाल्या.

**महागाई, बेरोजगारीचे संकट**

प्रियंका गांधी म्हणाल्या, गेल्या 45 वर्षांत जेवढी बेरोजगारी नव्हती. तेवढी बेरोजगारी आता देशात आहे. 70 टक्के तरूण बेरोजगारीचा सामना करत आहेत. गेल्या दहा वर्षांत केवळ समस्या वाढल्या आहेत. केवळ बेरोजगारीच नाही, तर महागाईही वाढली आहे. निवडणूक जवळ आल्यावर मोदींनी गॅसचे दर कमी केले. मात्र निवडणुकीच्या आधी तुम्ही हा निर्णय का नाही घेतला, असा सवाल प्रियंका गांधी यांनी उपस्थित केला.

# बोरिवलीमध्ये दिव्यांगांना मिळाली सुविधा ॲप आणि मतदान केंद्रांवरील सुविधांची माहिती

मुंबई

152 बोरीवली विधानसभा मतदार संघाच्यावतीने दिव्यांग मतदारांसाठी लोकसभा सार्वत्रिक निवडणुक 2024 प्रवेश योग्य आणि सर्वसमावेशक होण्याच्या दृष्टीने त्यांना सक्षम ॲप तसेच मतदान केंद्रावर त्यांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या इतर सोयीसुविधांची माहिती देण्यात आली.

या मेळाव्याला उपस्थित दिव्यांग मतदारांना सहायक निवडणुक निर्णय अधिकारी शिल्पा करमरकर यांनी मार्गदर्शन केले. या मेळाव्यास अतिरिक्त सहायक निवडणुक निर्णय अधिकारी इरेश चप्पलवार, स्वीप नोडल अधिकारी रविंद्र बोदडे, दिव्यांग सहाय्यता कक्षाचे किरण साबळे, दिव्यांग समन्वय अधिकारी कृतिका गंधारे उपस्थित होते.

मुंबई उपनगर जिल्ह्यात दिव्यांग मतदारांचा मतदानाचा टक्का वाढावा यासाठी लोकसभेच्या चारही मतदारसंघातील दिव्यांगांचे प्रबोधन आणि मार्गदर्शन करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राजेंद्र क्षीरसागर आणि २६- मुंबई उत्तर लोकसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी पंकज देवरे यांच्या यांच्या मार्गदर्शननाखाली मेळावा आणि जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून बोरिवली येथे दिव्यांग मतदारांना मार्गदर्शन करण्यात आले.

दिव्यांग मतदारांसाठी सर्व मतदान केंद्रे ही तळमजल्यावर उभारण्यात येणार आहेत. मतदान केंद्राच्या मार्गावर दिव्यांगांसाठी दिशादर्शक असणार आहेत.

ज्या मतदारांना व्हील चेअरची सुविधा हवी आहे, तसेच ज्या ज्येष्ठ नागरिकांना आणि दिव्यांगांना घरापासून ते मतदान केद्रांपर्यंत वाहनाची सुविधा तसेच सहायकाची गरज असेल अशा मतदारांनी पूर्व सूचना देणे गरजेचे आहे. त्यासाठी सक्षम ॲपवर ऑनलाईन पद्धतीनेही पूर्वसूचना स्वीकारण्यात येत आहेत. याची माहितीही यावेळी श्रीमती करमरकर यांनी दिली.

# आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची जेईई परीक्षेमध्ये उत्तुंग भरारी

चंद्रपूर

एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय चंद्रपूर अंतर्गत आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांकरीता मिशन शिखर उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना जेईई/नीट/सीईटी/एनडीए/सीएलएटी अशा विविधि परिक्षेचे मोफत मार्गदर्शन प्रशिक्षक / शिक्षक यांच्या मदतीने दिले जाते. दिनांक 24 एप्रिल 2024 ला जेईई ॲडव्हान्स परीक्षेचा निकाल जाहीर झाला. त्यामध्ये मिशन शिखर मधील 5 आदिवासी विद्यार्थी पात्र झाले आहेत.




यात सुनिता श्यामराव मेश्राम, रा. जिवती (69.14 टक्के), प्रितिका जंगु करपाते, रा. भारी (68.23 टक्के), अदिती उमेश जुमनाके, रा. मांडवा, ता. कोरपना (64.44 टक्के), अर्जुन विजु वेलादी, रा. कारगाव, ता. कोरपना (54.46 टक्के) आणि गौरव चित्तरंजन कोवे, रा. मोहाळी, ता. बल्लारपूर (47.46 टक्के) अशी पात्र विद्यार्थ्यांची नावे आहेत. हे सर्व विद्यार्थी चंद्रपूर जिल्हयातील असून आदिवासी समाजाचे आहेत तसेच हे विद्यार्थी एकलव्य मॉडेल रेसीडेंशिअल पब्लिक स्कुल, देवाडा येथे शिकत आहेत. सर्व पात्र विद्यार्थी व त्यांच्या पालकांना प्रकल्प कार्यालयात आमंत्रित करून त्यांना भेट वस्तू देवून त्यांचा सत्कार केला.

मिशन शिखर 2023-2024 अंतर्गत जेईई/नीट/सीईटी/एनडीए/सीएलएटी चा क्रॅश कोर्स प्रकल्पात राबविला जात असून त्यामध्ये यावर्षी सीईटी करीता 85, जेईई 27, नीट 54 आणि एनडीए साठी 20 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. भविष्यात जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थ्यांना परीक्षेमध्ये पात्र करणे हा आदिवासी विकास प्रकल्पाचा उद्देश असल्याचे प्रकल्प अधिकारी श्री. राचेलवार यांनी सांगितले. प्रकल्पात पहिल्यांदाच ऐवढ्या संख्येने आश्रम शाळेतील विदयार्थी जेईई सारख्या परीक्षेत पात्र झालेले आहेत. आदिवासी विद्यार्थीसुद्धा कोणत्याही परिस्थितीवर मात करून घवघवीत यश संपादन करू शकतो, हे या यशाने दाखवून दिले आहे. मे 2024 ला होणा-या विविध मेडिकल / इंजिनिअरींग परीक्षेकरीता मिशन शिखर अंतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे. त्यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी पात्र होतील, असा विश्वास प्रकल्प अधिकारी यांनी व्यक्त केला आहे.

यावेळी सर्व विद्यार्थी, पालक, शिक्षक, मिशन शिखर उपक्रमास भेट देणारे प्रकल्प कार्यालयातील अधिकारी, एकलव्य मॉडेल रेसीडेंशिअल पब्लिक स्कुल, देवाडा या सर्वांचे कौतुक करण्यात आले आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या उपक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले. प्रकल्पात आदिवासी विद्यार्थ्यांकरीता मिशन शिखर, समर कॅम्प, ताडोबा शैक्षणिक सहल, भारत दर्शन, परदेशी शिष्यवृत्तीचा लाभ, शिक्षकांकरीता भविष्यावेधी प्रणाली नुसार प्रशिक्षण, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना विविध अभ्यासपूरक प्रशिक्षण असे विविध उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

# मुंबईकरांनो 20 मे रोजी कुठेही जाऊ नका, मनापासून मतदान करा

## गायक शान यांचे आवाहन : खार परिसरात मतदान जनजागृतीसाठी निघाली रॅली

मुंबई

लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यातील चार मतदारसंघांसह मुंबई शहरातील सहाही मतदारसंघात 20 मे 2024 रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या दिवशी मुंबईकरांनी मुंबईतच थांबून मनापासून मतदान करावे, असे आवाहन प्रसिद्ध गायक शान ऊर्फ शंतनु मुखर्जी यांनी केले.



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये जनजागृतीसाठी मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांचा एक भाग म्हणून 29- मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या विधानसभेच्या 177- वांद्रे पश्चिम मतदारसंघांतर्गत मतदार जागरूकता आणि सहभाग (स्वीप) कार्यक्रमांतर्गत आज सकाळी आर. व्ही. टेक्निकल स्कूल, रामकृष्ण मार्ग, खार जिमखाना येथून 'व्होट टू व्होट रॅली'चे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. भागवत गावंडे, प्राचार्या नेहा जगतयानी, स्वीपच्या नोडल अधिकारी मेधा कांबळे नायब तहसिलदार निखिल घाडगे, योगेश पाटील आदी उपस्थित होते.

गायक श्री. शान म्हणाले की, आपले मतदान लोकशाहीचा आत्मा आहे. प्रत्येकाने मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. 20 मे 2024 रोजी बाहेरगावी जाण्याचे नियोजन केले असल्यास ते एक दिवस पुढे ढकलावे. मी सुद्धा मतदानाच्या दिवशी मुंबईतच राहणार असल्याचे गायक श्री. शान यांनी सांगितले.

रॅलीत गायक श्री. शान यांच्यासह सहभागी नागरिकांनी 'आपलं मत आपला अधिकार', 'बुढे हो या जवान- सभी करे मतदान', 'माय व्होट- माय फ्यूचर', 'आपका व्होट आपकी ताकत- आपका मत आपका अधिकार' आदी घोषणाही दिल्या. या रॅलीत नॅशनल कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी, नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# नवी मुंबईतील स्वच्छताकर्मीही करताहेत मतदान करण्याविषयीचे आवाहन

नवी मुंबई

ठाणे लोकसभा निवडणूक 20 मे रोजी संपन्न होत असून या निवडणुकीत प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा अधिकार बजावावा यादृष्टीने व्यापक स्वरूपात जनजागृती करण्यात येत आहे. महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती मोहिमेमध्ये विविध प्रसार माध्यमांचा वापर करण्यात येत असून त्याला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

नवी मुंबई हे स्वच्छतेत देशामध्ये अग्रमानांकित असणारे शहर असून येथील सेवाभावी वृत्तीने काम करणारे स्वच्छताकर्मी दैनंदिन स्वच्छता कार्याप्रमाणेच विविध लोकोपयोगी उपक्रमातही मनापासून सहभागी होत असतात. या अनुषंगाने स्वच्छताकर्मींच्या गणवेशावर लोकसभा निवडणुकीत मतदान करण्याविषयी नागरिकांना आवाहन करणारे बिल्ले (Badges) लावून त्या माध्यमातून मतदान करण्याविषयी संदेश प्रसारण करण्याचा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

बेलापूर, नेरूळ, वाशी, तुर्भे, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली, दिघा अशा आठही विभाग कार्यालय क्षेत्रातील स्वच्छताकर्मींच्या गणवेशावर हे बिल्ले झळकत असून, त्यावर असलेल्या 'मी मतदान करणारच. तुम्हीदेखील आपला मतदानाचा हक्क बजावा. माझे मत माझा अधिकार' - अशा मजकुरातून अभिनव पद्धतीने मतदान करण्याविषयीचे आवाहन केले जात आहे. याशिवाय महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारीही मतदान करण्याविषयीच्या जनजागृतीपर संदेशांचे प्रसारण करीत आहेत.





# देशात दुसऱ्या टप्प्यातील मतदान शांततेत

## महाराष्ट्रात सरासरी ५३ टक्के मतदान

## त्रिपुरात सर्वाधिक, तर यूपीत सर्वात कमी

वृत्तसंस्था
नवी दिल्ली / मुंबई

**लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील ८८ लोकसभा मतदारसंघात आज काही किरकोळ घटना वगळता शांततेत मतदान पार पडले. दुसऱ्या टप्प्यात त्रिपुरात सर्वाधिक मतदानाची नोंद झाली. तर उत्तर प्रदेशात सर्वात कमी मतदान झाल्याचे बघायला मिळाले.महाराष्ट्रात या टप्प्यात ५३.५१ टक्के इतके मतदान झाले.**



निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार, त्रिपुरात सर्वाधिक ७७.५३ टक्के नागरिकांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. तर उत्तर प्रदेशात सर्वात कमी म्हणजेच ५२.७४ टक्के मतदानाची नोंद झाली. तसेच मणिपूरमध्ये ७६.०६ टक्के, पश्चिम बंगालमध्ये ७१.८४ टक्के, छत्तीसगडमध्ये ७२.१३ टक्के आणि आसाममध्ये ७०.६६ टक्के मतदान झाले.

शुक्रवारी सकाळी ७ वाजता दुसऱ्या टप्प्यातील मतदानाला सुरुवात झाली होती. दुसऱ्या टप्प्यात एकूण १२ राज्यातील मिळून ८८ लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडले.

महत्त्वाचे म्हणजे उन्हाचा पारा बघता अनेक ठिकाणी मतदानाची वेळ सायंकाळी ६ पर्यंत वाढवण्यात आली होती. महत्त्वाचे म्हणजे १९ एप्रिल रोजी पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले होते. यावेळी देशभरातील १०२ मतदारसंघांत ६५.५ टक्के मतदान झाले होते.

महाराष्ट्रात ५३.५१ टक्के, बिहारमध्ये ५३.०३ टक्के, मध्य प्रदेशमध्ये ५४.८३ टक्के, राजस्थानमध्ये ५९.१९ टक्के, तसेच केरळमध्ये ६३.९७ टक्के, कर्नाटकमध्ये ६३.९० टक्के आणि जम्मू काश्मीरमध्ये ६७.२२ टक्के मतदान झाल्याचं बघायला मिळाले.

### मेळघाटातील चार आदिवासी गावांचा मतदानावर बहिष्कार

***अमरावती :*** *देशभरात आज लोकसभा निवडणूक २०२४ साठी मतदान सुरू आहे. मात्र अमरावतीतील मेळघाटात मतदारांना कोणत्याच सुविधा नाहीत. त्यामुळे मेळघाटातील चार गावांनी मतदानावर बहिष्कार टाकला आहे. यात धारणी तालुक्यात येणाऱ्या रंगूबेली, धोकडा, कुंड आणि खामदा या अतिदुर्गम गावातील ग्रामस्थांनी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार टाकला आहे. आज अमरावती लोकसभा मतदारसंघात सर्वत्र मतदान प्रक्रिया राबविली जात असताना या चार गावातील ग्रामस्थांनी मतदान करण्यास नकार दिला. गावांमध्ये कुठल्याही सुविधा नाहीत : सातपुडा पर्वत रांगेत मेळघाटात अतिदुर्गम भागात वसलेल्या या चारही गावांना बाहेरच्या जगाशी जोडणारे रस्ते नाहीत. या गावात कुठलं वाहन देखील पोहोचू शकत नाही, अशी अवस्था आहे. यासह वीज पुरवठा या चारही गावांमध्ये नाही, पिण्याचं पाणी देखील नाही. यासह आरोग्य सेवा देखील या गावांमध्ये उपलब्ध नाही.*

# काँग्रेसने बॅलेट पेपर लुटून आजवर राज्य केले...

## पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर जोरदार हल्ला

वृत्तसंस्था
पाटणा

काँग्रेसचे राजकुमार म्हणाले होते की, प्रत्येक कुटुंबाचे उत्पन्न आणि मालमत्तेचे सर्वेक्षण करणार आहे. वारसा कर लावून तुमच्याकडून लुटलेली संपत्ती काँग्रेस आपल्या खास व्होट बँकेत वाटून देईल. आज संपूर्ण देश, तरुण, वृद्ध आई-वडील चिंतेत आहेत. त्यामुळे सारा देश एका आवाजात म्हणतोय- काँग्रेसची लूट, जिंदगी के साथ भी और जिंदगी के बाद भी...,काँग्रेसने बॅलेट पेपर लुटून राज्य केले म्हणूनच त्यांचा ईव्हीएमवर आक्षेप आहे, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारच्या मुंगेर येथील प्रचार सभेत काँग्रेसवर जोरदार शाब्दिक हल्ला चढवला.

डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाच्या साधनसंपत्तीवर पहिला हक्क मुस्लिमांचा आहे, असे कधीच म्हटले नव्हते, असा खोटा प्रचार काँग्रेसने केला. पण आज डॉ. मनमोहन सिंग यांचा आणखी एक जुना व्हिडीओ समोर आला आहे, ज्यात ते हेच सांगत आहेत की देशाच्या संसाधनांवर पहिला हक्क मुस्लिमांचा आहे. हा व्हिडीओ समोर आल्यानंतर काँग्रेस आणि त्यांचे संपूर्ण इकोसिस्टम शांत झाले आहे,असे मोदी म्हणाले.



### मतदान केंद्रे लुटणाऱ्यांना 'सर्वोच्च' दणका

*पंतप्रधान मोदी म्हणाले की, राजद आणि काँग्रेसच्या इंडिया आघाडीला ना देशाच्या संविधानाची काळजी आहे, ना लोकशाहीची. अनेक दशके बॅलेट पेपरच्या बहाण्याने गरिबांचे हक्क हिसकावून घेणारे हेच लोक आहेत.मतदान केंद्र आणि मतपत्रिका लुटण्यात आल्या. गरिबांना ईव्हीएमची ताकद मिळाल्याने निवडणुकीच्या दिवशी लुटमार करणाऱ्यांना हे आता सहन होत नाही. त्यामुळेच त्यांना ईव्हीएम हटवायचे आहे, पण मतपेट्यांची लूट करण्याचा इरादा असलेल्यांना आज सर्वोच्च न्यायालयाने एवढा मोठा दणका दिला आहे की, त्यांच्या सर्व स्वप्नांचा चुराडा झाला आहे.*

# पंतप्रधान मोदी हल्ली घाबरलेत

## थोड्याच दिवसांत मंचावर अश्रू ढाळतील...

वृत्तसंस्था
बंगुळुरु

काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी कर्नाटकातील विजापूर येथील निवडणूक रॅलीदरम्यान आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी यांच्यावर जोरदार हल्लाबोल चढवला. ते म्हणाले ,आजकाल पंतप्रधान नरेंद्र मोदी भाषण करताना खूप नर्व्हस असतात. कदाचित काही दिवसांत ते स्टेजवर अश्रू ढाळतील.

राहुल म्हणाले- पीएम मोदींनी गेल्या १० वर्षात गरिबांचे पैसे हिसकावले आहेत. त्यांनी केवळ २० -२५ लोकांना अब्जाधीश बनवले आहे. या अब्जाधीशांकडे ७० कोटी भारतीयांइतकी संपत्ती आहे. भारतात 1% लोक आहेत जे ४० % संपत्तीवर नियंत्रण ठेवतात. काँग्रेस खासदार पुढे म्हणाले- मोदी काही लोकांना अब्जाधीश बनवतात, काँग्रेस सरकार करोडो लोकांना करोडपती बनवेल. बेरोजगारी, महागाई हटवून काँग्रेस तुम्हाला सहभाग देईल. मोदींनी अब्जाधीशांना जेवढे पैसे दिले तेवढेच पैसे आम्ही गरिबांना देऊ.




### ही निवडणूक सर्व निवडणुकीपेक्षा वेगळी...

*ही लोकसभा निवडणूक सामान्य निवडणूक नाही. मागील निवडणुकांपेक्षा ही वेगळी आहे, कारण भारताच्या इतिहासात प्रथमच एक पक्ष (भाजप) आणि एक व्यक्ती (भाजप) भारताचे संविधान आणि लोकशाही नष्ट करण्याचा प्रयत्न करत आहेत. दुसरीकडे, काँग्रेस आणि भारत आघाडी संविधान वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. भारतीय राज्यघटनेने लोकांना अधिकार, आवाज आणि आरक्षण दिले आहे. संविधानापूर्वी भारतावर राजे आणि सम्राटांचे राज्य होते. आज जर भारतातील गरीब, मागास, दलित आणि आदिवासींना हक्क आणि आवाज असेल तर तो संविधानाने दिला आहे,असेही राहुल गांधी यांनी स्पष्ट केले.*

# EVM-VVPAT पडताळणीशी संबंधित सर्व याचिका फेटाळल्या

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी ईव्हीएम आणि व्हीव्हीपीएटी स्लिप्सच्या 100% क्रॉस चेकिंगची मागणी करणाऱ्या सर्व याचिका फेटाळल्या. याशिवाय बॅलेट पेपरद्वारे मतदान करण्याचा सल्ला देणारी याचिकाही न्यायालयाने फेटाळून लावली. या प्रकरणाची सुनावणी करणारे दोन्ही न्यायाधीश - न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता म्हणाले की, एखाद्या यंत्रणेवर आंधळेपणाने विश्वास न ठेवल्याने अनावश्यक शंका निर्माण होऊ शकतात. आम्ही प्रोटोकॉल, तांत्रिक बाबींवर तपशीलवार चर्चा केली आहे.



आम्ही 2 सूचना दिल्या. पहिली- सिम्बॉल लोडिंगची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, सिम्बॉल लोडिंग युनिट सील केले पाहिजे. सिम्बॉल लोडिंग युनिट 45 दिवसांसाठी साठवले पाहिजे. दुसरी- उमेदवारांच्या आवाहनावर निकालानंतर अभियंत्यांची एक टीम मायक्रोकंट्रोलर ईव्हीएममधील बर्न मेमरी तपासेल. हे काम निकाल जाहीर झाल्यापासून 7 दिवसांच्या आत केले पाहिजे. त्याचा खर्च उमेदवाराला करावा लागेल. यापूर्वी 24 एप्रिल रोजी 40 मिनिटांच्या सुनावणीनंतर खंडपीठाने निर्णय राखून ठेवला होता. न्यायमूर्ती संजीव खन्ना म्हणाले होते की, आम्ही गुणवत्तेवर पुन्हा सुनावणी करत नाही. आम्हाला काही निश्चित स्पष्टीकरण हवे आहे. म्हणून निर्णय राखून ठेवला.

# अमेरिकेत पोलिसांनी केली भारतीय तरुणाची हत्या

## रूममेटला कारने मारल्याचा होता आरोप

